Publication: Lokmat
Date: 13/3/2020
Page: 1 - 3
Column: 1 - 2

लोकमत मुंबई, शुक्रवार, दि. १३ मार्च २०२०

## विद्युत सुरक्षितता उपायांबाबत जनजागृती

मुंबई : राष्ट्रीय सुरक्षितता दिवस नुकतेच अदानी इलेक्ट्रिसिटीने साजरा केला. याअंतर्गत वीज वितरण क्षेत्रातील ग्राहकांना विद्युत सुरक्षितता उपायांबाबत शिक्षण देण्यासाठी आठवडाभराच्या शिक्षण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सुरक्षितता परिषदेने सुरु केलेल्या या चळवळीने ४९वा स्थापना दिन साजरा केला. वृत्त/३

## विद्युत सुरक्षितता उपायांबाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : राष्ट्रीय सुरक्षितता दिवस नुकतेच अदानी इलेक्ट्रिसिटीने साजरा केला. याअंतर्गत वीज वितरण क्षेत्रातील ग्राहकांना विद्युत सुरक्षितता उपायांबाबत शिक्षण देण्यासाठी आठवडाभराच्या शिक्षण मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सुरक्षितता परिषदेने सुरु केलेल्या या चळवळीने यंदा आपला ४९वा स्थापना दिन साजरा केला. यासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने सुरक्षितता कशी आणखी बळकट करता येईल, या विषयावर जोर देण्यात आला.

मानवी आयुष्याच्या संरक्षणात निर्णायक महत्त्वाच्या प्रतिबंधात्मक उपायांबाबत सर्व वयोगटांतील नागरिकांना माहिती देण्यात आली. कुर्ला येथील बैलबाजारमधल्या ग्राहकांसाठी त्यांच्या घरी, शेजारी विजेच्या सावधगिरीबाबतच्या उपायांबाबत मार्गदर्शक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.